- 4 NOV 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दर्जेदार संशोधन धोरण निश्चितीसाठी उपयुक्त

## डॉ. निरुपमा डांगे; विद्यापीठात जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात स्थापन केलेल्या जनगणना माहिती कार्य केंद्रामध्ये दर्जेदार संशोधन व्हावे. त्याच्या माध्यमातून प्रशासनाला धोरणे निश्चित करण्यासाठी योग्य दिशादर्शन व्हावे, अशी अपेक्षा जनगणना कार्य संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात संचालनालयाच्या जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राची स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार व कार्य केंद्र उद्घाटन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. संचालनालयाविषयी वरिष्ठ अधिकारी ए. एन. राजीव यांनी विशेष सादरीकरण केले. अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले. यावेळी व्ही. ए. अहिरे, वाय. एस. पाटील, किरण गुरव, प्रवीण भगत, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्थापन केलेल्या जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. निरुपमा डांगे. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ए. एन. राजीव आदी.**

### देशातील १२ वे केंद्र

देशातील १८ विद्यापीठांपैकी शिवाजी विद्यापीठात १२ वे कार्यकेंद्र स्थापन केले आहे. संशोधन केंद्रातील सुविधांचा लाभ विद्यापीठासह बाहेरील संशोधकांना घेता येणार आहे.

- 4 NOV 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांना मिळणार जनगणनेतील मूलभूत माहिती : डॉ. निरूपमा डांगे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : 'शिवाजी विद्यापीठातील जनगणना माहिती कार्यकेंद्रामध्ये दर्जेदार संशोधन व्हावे. त्या माध्यमातून प्रशासनाला धोरणे निश्चित करण्यासाठी योग्य दिशादर्शन व्हावे', अशी अपेक्षा जनगणना कार्य संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी आज येथे व्यक्त केली.

विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात संचालनालयाच्या जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राची स्थापना केली आहे. या अनुषंगाने विद्यापीठासमवेत सामंजस्य करार आणि कार्यकेंद्राचे औपचारिक उद्घाटन अशा संयुक्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि संचालक डॉ. निरुपमा डांगे. यावेळी शेजारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, ए. एन. राजीव, व्ही. ए. अहिरे.

डॉ. डांगे म्हणाल्या, 'जनगणनेद्वारे प्राप्त होणारी माहिती ही अत्यंत मूलभूत असते. तिची गोपनीयता ही सर्वोच्च प्राधान्याची बाब असली तरी संशोधकांना ही माहिती उपलब्ध करून देऊन देशाला दिशादर्शक अशी धोरणे आखण्यासाठी तिचा अतिशय उत्तम वापर करता येऊ शकतो.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सामंजस्य करार दूरगामी उपयुक्त स्वरुपाचा ठरेल. संचालनालयानेही काही संशोधनात्मक प्रश्न सुचवावेत, म्हणजे त्यांनाही आवश्यक ते विश्लेषण येथूनच करून देता येईल.' यावेळी ए. एन. राजीव यांनी सादरीकरण केले. यावेळी व्ही. ए. अहिरे, वाय. एस. पाटील, किरण गुरव, प्रवीण भगत, डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.

- 4 NOV 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दर्जेदार संशोधन धोरण निश्चितीसाठी उपयुक्त

## डॉ. निरुपमा डांगे : विद्यापीठात जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्राचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या जनगणना माहिती कार्य केंद्रामध्ये दर्जेदार संशोधन व्हावे आणि त्या माध्यमातून प्रशासनाला धोरणे निश्चित करण्यासाठी योग्य दिशादर्शन व्हावे, अशी अपेक्षा जनगणना कार्य संचालनालयाच्या (महाराष्ट्र) संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात संचालनालयाच्या जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार आणि कार्य केंद्राचे औपचारिक उद्घाटन अशा संयुक्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या.



कोल्हापूर : सामंजस्य कराराप्रसंगी कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि संचालक डॉ. निरुपमा डांगे आदी मान्यवर.

डॉ. डांगे म्हणाल्या, जनगणनेद्वारे प्राप्त होणारी माहिती ही अत्यंत मूलभूत असते. तिची गोपनीयता ही सर्वोच्च प्राधान्याची बाब असली तरी संशोधकांना ही माहिती उपलब्ध करून देऊन देशाला दिशादर्शक अशी धोरणे आखण्यासाठी तिचा अतिशय उत्तम वापर करता येऊ शकतो.

यावेळी संचालनालयाविषयी वरिष्ठ अधिकारी ए. एन. राजीव यांनी विशेष सादरीकरण केले. सामंजस्य करारावर संचालनालयाच्या वतीने संचालक डॉ. डांगे यांनी, तर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

कार्यक्रमास जनगणना कार्य संचालनालयातर्फे व्ही. ए. अहिरे, वाय. एस. पाटील, किरण गुरव आणि प्रवीण भगत हे अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या वतीने अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश पवार, अभिजित रेडेकर आदी उपस्थित होते.

- 4 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुवादातून संस्कृतींमध्ये सुसंवादाचे कार्य

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : शिवाजी विद्यापीठात अनुवादकांच्या राष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ

▶ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : येथे अनुवादक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. माया पंडित, मेघा पानसरे उपस्थित होत्या.

कोल्हापूर, ता. ३ : विविध संस्कृतींमध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्याचे कार्य अनुवादाच्या माध्यमातून होते. बहुसांस्कृतिक समाजामध्ये एकजिनसीपणा कायम राखण्याच्या दृष्टीने अनुवाद आणि अनुवादकांचे स्थान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात भारतीय अनुवाद साहित्य, भुवनेश्वर (ओडिशा) यांच्या सहकार्याने अनुवादकांच्या दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात प्रारंभ झाला. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. बीजभाषक म्हणून हैद्राबादच्या इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाच्या माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित, तर अध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते.

डॉ. मुळे म्हणाले, 'भारतासारख्या बहुसांस्कृतिक व बहुभाषिक देशामध्ये जिथे संविधानातच २२ भाषांची नोंद आहे आणि जिथे इतक्या भाषांमधील साहित्य प्रकाशित करणारी प्रचंड व्याप असणारी साहित्य अकादमी आहे. तिथे भाषा ही दोन माणसांत केवळ संवादाचे नव्हे, तर या सर्व संस्कृतींना जोडणाऱ्या पुलाचे काम करते. त्यामुळे देशाची एकता, अखंडता कायम राहते.'

डॉ. पंडित म्हणाल्या, 'साहित्यविश्वाने अनुवाद, अनुवादकांची कायम उपेक्षा केली. अनुवादांची समीक्षाही केली जात नाही, इतके दुय्यमत्व त्याला दिले जाते. अनुवादाचे सांस्कृतिक व्यवहारात स्थान काय, असा प्रश्न उपस्थित केला जातो. अनुवादक फक्त भाषांतर करतो, असे म्हणत त्यांना लेखकाचा दर्जाही नाकारला जातो, हे क्लेशकारक आहे. अनुवाद सृजनात्मक प्रक्रिया आहे.'


यावेळी विविध भाषांतील आठ अनुवादित पुस्तकांचे प्रकाशन झाले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. भारतीय अनुवाद साहित्यचे सचिव शरदचंद्र आचार्य यांनी आभार मानले.

### अनुवादाकडे संधी म्हणून पाहावे

डॉ. शिर्के म्हणाले, 'अनुवादाच्या प्रक्रियेकडे उद्योग-व्यवसाय संधीच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. उद्योग-व्यवसायांसाठी अनुवाद आणि अनुवादाचा उद्योग-व्यवसाय या दोन्ही अंगांनी पहावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 NOV 2023
लोकसत्ता

# बहुसांस्कृतिक समाजात एकजिनसीपणासाठी अनुवाद महत्त्वाचा – डॉ. ज्ञानेश्वर मुळे



अनुवादकांच्या राष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** विविध संस्कृतींमध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्याचे कार्य अनुवादाच्या माध्यमातून होते. बहुसांस्कृतिक समाजामध्ये एकजिनसीपणा कायम राखण्याच्या दृष्टीने अनुवाद आणि अनुवादकांचे स्थान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक तथा राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून भारतीय अनुवाद साहित्य, ओडिशा यांच्या सहकार्याने अनुवादकांच्या दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. या परिषदेचे उद्घाटक म्हणून डॉ. मुळे बोलत होते.

भावनांच्या अभिव्यक्तीसाठी मातृभाषा, राष्ट्रभाषा महत्त्वाच्या असल्याचे सांगून डॉ. मुळे म्हणाले, की माणसांच्याही आधी भाषा जगाच्या पाठीवर सर्वदूर पसरलेली असते. मराठीमध्ये आपल्या भोवतालातील भाषांबरोबरच अरबी, फारसी अशा अनेकविध भाषांमधून शब्द आलेले आहेत. मराठी, संस्कृतमधील अनेक शब्द जगाच्या पाठीवरील अन्य भाषांमध्ये जाऊन प्रस्थापित झालेले आहेत.

बीजभाषणामध्ये डॉ. माया पंडित म्हणाल्या, की साहित्यविश्वाने अनुवाद आणि अनुवादक यांची कायम उपेक्षा केली आहे. अनुवादांची समीक्षाही केली जात नाही, इतके दुय्यमत्व त्याला दिले जाते. अनुवादक फक्त भाषांतर करतो, असे म्हणत त्यांना लेखकाचा दर्जाही नाकारला जातो, हे क्लेशकारक आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी अनुवादाच्या प्रक्रियेकडे उद्योग-व्यवसाय संधीच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असल्याचे सांगितले. परदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला, तर भारतीय अनुवाद साहित्यचे सचिव शरदचंद्र आचार्य यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023

पुढारी

# 'वसुधैव कुटुंब'पणाची जाणीव भाषांतर संस्कृतीमुळे विकसित

## रघू मिश्रा; विद्यापीठात अनुवाद परिषदेचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'वसुधैव कुटुंब'पणाची जाणीव भाषांतर संस्कृतीमुळे विकसित होते, असे प्रतिपादन भाषांतरकार रघू मिश्रा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित भाषांतरकारांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे ते म्हणाले, भाषांतरामुळे सांस्कृतिक आदान-प्रदान केले जाते. परस्परसंबंध, अधिक सौहार्दाचे होतात. यासाठी अनुवादकांनी काळजीपूर्वक अनुवाद केला पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. अवनीश पाटील यांनी, वाङ्मयीन भाषांतराबरोबर ऐतिहासिक आणि पुरातत्त्व कागदपत्रांचे भाषांतर होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. भारतीय अनुवाद साहित्य भुवनेश्वरचे सचिव सरत आचार्य यांनी मनोगत व्यक्त केले.

परिषदेमध्ये भारतातील ५० हून अधिक भाषांतरकार सहभागी झाले होते. प्रा. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. राजश्री बारवेकर उपस्थित होते.

- 4 NOV 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसुधैव कुटुंबपणाची जाणीव भाषांतर संस्कृतीमुळे विकसित

## रघू मिश्रा : भाषांतरकारांच्या राष्ट्रीय परिषदेचा समारोप

कोल्हापूर : वसुधैव कुटुंबपणाची जाणीव भाषांतर संस्कृतीमुळे विकसित होते असे प्रतिपादन भाषांतरकार रघू मिश्रा यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित भाषांतरकारांच्या राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, वाङ्मयीन भाषांतराबरोबर ऐतिहासिक व पुरातत्त्व कागदपत्रांचे भाषांतर होणे गरजेचे आहे. भुवनेश्वर येथील भारतीय अनुवाद साहित्याचे सचिव सरत आचार्य यांनी मनोगत व्यक्त केले. ५०वर भाषांतरकार सहभागी झाले होते. या परिषदेत भाषांतराची प्रक्रिया, इतिहास, फलश्रुती व भाषांतर प्रक्रियेतील गुंते या मुद्द्यांच्या अनुषंगाने चर्चा झाली. शुक्रवारच्या सत्रात कृष्णा गुडो (आसाम), श्रीरंजन आवटे (पुणे), डॉ. नितीन जरंडीकर (कोल्हापूर), गणेश विसपूते (पुणे), प्रवासिनी महाकुड (ओडिशा), सोनाली नवांगुळ (कोल्हापूर), शरद आचार्य (भुवनेश्वर), सबिता रौत (ओडिशा), बासीरन बीबी (ओडिशा), गोरख थोरात (पुणे), पेरुमल किट्टुस्वामी (तंजावर), मिता दास (प. बंगाल), मंजुळा मोहंती कविता गोस्वामी (ओडिशा), रघुनाथ कडाकणे, धनंजय देवळालकर (कोल्हापूर), अजय वर्मा (म्हैसूर), बिजया प्रधान (ओरिसा) यांनी सहभाग घेतला. प्रा. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी आभार मानले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. राजश्री बारवेकर उपस्थित होते. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023
लोकमत

# तुकाराम डोंगळे यांना पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अॅन्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना



मराठी विज्ञान परिषदेचा 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार' जाहीर झाला. अत्यंत कमी वयात हा पुरस्कार मिळविणारे डॉ. डोंगळे हे पहिलेच अध्यापक-संशोधक आहेत. हा पुरस्कार मिळविणारे विद्यापीठातीलही ते पहिलेच शिक्षक आहेत.

भारतीय विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील ऋषितुल्य गणल्या जाणाऱ्या मुंबईतील यू.डी.सी.टी.चे निवृत्त संचालक प्रा. मनमोहन शर्मा यांच्या नावे हा पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये रोख, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. डॉ. डोंगळे यांचे मेमरी डिव्हायसेस, न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता यात संशोधन आहे. जागतिक स्तरावरील आघाडीच्या २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश आहे. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी त्यांना ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023
तरुण भारत



# विभाग प्रमुखांच्या विनंतीवरून बीजेसी परीक्षा १ डिसेंबरपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील बीजेसीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार बीजेसीचे नाव बदलून 'पीजी डिप्लोमा ॲण्ड जर्नालिझम' असे करण्यात आले आहे. त्यानुसार अभ्यासक्रम तयार केला असून, मान्यतेसाठी अस्थापना विभागाकडे पाठवला आहे. त्यामुळे विभागप्रमुखांनी पत्राव्दारे केलेल्या विनंतीला मान देऊन, परीक्षा पुढे ढकलली आहे. या परीक्षा १ डिसेंबरपासून सुरू होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिली.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला प्रारंभ झाला आहे. त्यानुसार 'पीजी डिप्लोमा ॲण्ड जर्नालिझम' असे नाव बदलून अभ्यासक्रमात बदल केला आहे. बदलेला नवीन अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर एमजेसीबरोबर या डिप्लोमाच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. अधिविभागही अस्थापनाच्या मान्यतेची वाट पाहात आहे. तसेच विद्यार्थ्यांचे सध्या प्रॅक्टीकल सुरू असून जुन्या व नव्या अशी संयुक्तिकरित्या परीक्षा घेतली जाणार आहे. विभागाने पाठवलेल्या पत्राला मान्यता देवून पुढील वेळापत्रक परीक्षा विभागाने 'पीजी डिप्लोमा ॲण्ड जर्नालिझम' विभागाला पाठवले आहे. नवीन वेळापत्रकानुसार पुढे ढकलेल्या परीक्षा होणार आहेत.

**प्रशासनाच्या मान्यतेनंतर परीक्षा होणार**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम तयार केला आहे. कुलगुरूंच्या परवानगीने 'पीजी डिप्लोमा ॲण्ड जर्नालिझम' चा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवला आहे. या प्रस्तावाला प्रशासनाची मान्यता कधी येणार याचीच विभागाला प्रतिक्षा आहे. मान्यता आल्यानंतर पुढे ढकलेल्या परीक्षा नवीन वेळापत्रकानुसार घेतल्या जातील.

– **डॉ. निशा पवार** (विभागप्रमुख, पीजी डिप्लोमा ॲण्ड जर्नालिझम, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेस तीन हजार विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुक्रवारी झाल्या. ३ हजार ७६ विद्यार्थ्यांपैकी ३९१ विद्यार्थी गैरहजर होते. विद्यापीठ हिवाळी सत्राच्या सध्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी मास्टर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, ड्रेस मेकिंग अँड फॅशन डिझाईन, मास्टर ऑफ आर्टस् (योगशास्त्र), मास्टर ऑफ आर्टस् (होम सायन्स), मास्टर ऑफ आर्टस् (वुमेन स्टडीज) आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागांमध्ये झाल्या. भरारी पथकांकडून सांगली ०७, कोल्हापूर - २०, सातारा - ०७ अशी तिन्ही जिल्ह्यांतून ३४ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023
लोकमत

# विद्यापीठ परीक्षांना ३९१ विद्यार्थ्यांची दांडी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२३ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु असून शुक्रवारी बी.एस्सी,बीसीए, बी. एस्सी फूड टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड मॅनेजमेंट यासह १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालये व अधिविभागात पार पडल्या. परीक्षांसाठी ३०७६ विद्यार्थ्यांपैकी ३९१ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेवेळी सांगली, सातारा जिल्ह्यात प्रत्येकी ७ तर कोल्हापूरमध्ये २० कॉपीचे गैरप्रकार आढळून आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 NOV 2023

तरुण भारत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या परीक्षेत ३४ गैरप्रकार उघड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर–२०२३ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगली विभागात ०७, कोल्हापूर विभागात २० सातारा विभागात ०७ अशा तिन्ही जिल्ह्यातून एकूण ३४ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली. यामध्ये कोल्हापूर विभागात सर्वात जास्त गैरप्रकार आढळले आहेत. विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये परीक्षांसाठी एकूण ३०७६ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंद केली आहे. ३९१ विद्यार्थी अनुपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

जनसंपर्क कक्ष
- 4 NOV 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'जे. जे.'ची अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड

## प्राचार्या शुभांगी पाटील, उमेश देशन्नावर यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

जयसिंगपूर : येथील डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयाची शिवाजी विद्यापीठाकडून प्रमुख अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड झाल्याची माहिती प्राचार्या डॉ. शुभांगी पाटील व डॉ. उमेश देशन्नावर यांनी दिली.

या योजनेद्वारे विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्याकरिता वेगवेगळे निरंतर शिक्षणाचे कार्यक्रम घेणे, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे व समाजभिमुख उपक्रम राबविणे हे ध्येय या योजनेचे असते. जे. जे. मगदूम महाविद्यालय सर्व महाविद्यालयांना सोबत घेऊन ही भूमिका निभावेल, असा विश्वास मा. प्राचार्या डॉ. पाटील यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांमधून अग्रणी महाविद्यालय म्हणून विनाअनुदानित इंजिनिअरिंग कॉलेजची निवड होणे ही कॉलेजच्या दृष्टिकोनातून प्रशंसनीय बाब असल्याचे डॉ. सुनील आडमुठे यांनी सांगितले.

डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय मगदूम आणि उपाध्यक्षा डॉ. सोनाली मगदूम यांनी कुलगुरूंचे आभार मानले. तसेच दिलेल्या संधीची व सन्मानाची जबाबदारी महाविद्यालय व्यवस्थित पार पडेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.